दि:23 जानेवारी 2014

# ना काही विकण्यासाठी आणि ना काही दिखाव्यासाठी.

अरुण जेटली

विरोधी पक्षनेते (राज्यसभा)

प्रतिकूल राजकीय वातावरणात समोर येत नसल्याने शेवटी युपिए च्या दोन प्रमुख मंत्र्यांनी तोंड उघडले. पी.चिदंबरम विश्व आर्थिक मंचाच्या बैठकीत भाग घेण्यासाठी दावोस येथे आहेत. अपेक्षा वाटक होती की, जेव्हा ते विभिन्न देशांच्या राजकीय आणि व्यापार नेत्यांना भेटतील तेव्हा भारतीय अर्थव्यवस्थेचे गुणगाण करतील. मात्र याउलट त्यांनी भाजपा आणि मोदी यांच्यावर बोलले. त्यांनी राष्ट्रीय अर्थव्यवस्था चालवण्यासाठी भाजपाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हं निर्माण केले. लोकांना माहित असेल की 1998 ते 2004 दरम्यान भारताच्या अर्थव्यवस्थेचे प्रबंध कशाप्रकारे करण्यात आले होते. योगायोगाने ज्या दिवशी ते भाजपा आणि नरेंद्र मोदी यांच्याबाबत दावोस येथे बोलत होते. त्याच दिवशी मूडी ने एक रिपोर्ट जारी केला त्याची माहिती मिडियामध्ये देण्यात आली आहे. त्यामध्ये असे संकेत देण्यात आले की, कायापालटासाठी उद्योग आज नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात राजकीय बदलाची वाट पाहत आहेत.

कपिल सिब्बल यांनी आपल्या परिचित अंदाजात विरोधकांसंदर्भात चर्चा केली. त्यांच्या ब्लॉग मध्ये नरेंद्र मोदी यांना सेल्समन आणि अरविंद केजरीवाल यांना शो मॅन बोलले गेले. त्यांनी आणि वित्त मंत्र्यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले की जिथे, मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, गुजरात आणि गोवा आज या राज्यांपैकी एक आहे ज्या राज्यांमध्ये सुशासन आहे आणि जिथे जीडीपी राष्ट्रीय सरासरी पेक्षा खुप अधिक आहे तर पहिले यांपैकी तीन राज्या आजारी राज्य होते, तर मध्य प्रदेश आणि गुजरात सारख्या राज्यांमध्ये कृषि विकास दर दोन अंकी आहे त्यामुळे तिथे समृद्धि आली आहे.

मात्र कपिल सिब्बल यांच्या सेल्समन ची गोष्ट निराळी आहे. त्यांनी प्रश्न केला की, बीएस येडीयुरप्पा यांच्या भाजपातील प्रवेशाबाबत मोदी गप्प का आहेत. त्यानंतर त्यांनी भाजपा शासित अन्य राज्यांना मंत्र्यांच्या विरोधात लावण्यात आलेल्या त्या आरोपांचा उल्लेख केला जे आरोप अजून साबित झाले नाहीत.

ज्या वेळी बीएस येडीयुरप्पा यांच्या विरोधात आरोप पत्र दाखल करण्यात आले, पक्षाने त्यांना राजीनामा देण्यास सांगितले. त्यामुळे कर्नाटक विभागात दरार पडली आणि राज्य सरकारला त्याची किंमत भरावी लागली. आज ते बेशर्त पक्षात शामिल झाले आहेत. त्यांच्या विरोधात लावण्यात आलेले काही आरोप उच्च न्यायालयाने रद्द केले आणि बाकींचा खटला चालू नाही. पक्षाने त्यांना कोणतेही पद दिलेले नाही मात्र त्यांनी भाजपासाठी बेशर्त काम करण्यासाठी मान्य केले आहे.

कपिल सिब्बल यांनी आपला पक्ष काय करतो आहे त्याच्याशी याची तुलना करायची. त्यांनी दोषी लालूप्रसाद यादव यांच्याशी युती कायम करणे पसंत केले. राज्यपाल द्वारे खटला चालवण्याची अनुमती न देऊन त्यांनी आपले पूर्व मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा बचाव करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांची सरकार आतापर्यंत सर्वात मोठ्या भ्रष्टाचारात शामिल राहिली मग ते 2 जी स्पेक्ट्रम वाटप असो किंवा कोळसा खाण वाटप असो. भारतात वीज क्षेत्र प्रभावित होत आहे कारण मोठ्या संख्येने कोळसा खाणी ठप्प पडल्या आहेत. त्यांच्या पक्षाचे नेतृत्त्व हिमाचल प्रदेशाचे मुख्यमंत्र्यांच्या विरोधात कारवाई करण्यास असमर्थ आहे जिथे चेक स्वरुपातून बेकायदेशीर रित्या संतुष्ट करण्यात आले. मला खात्री आहे की, सिब्बल यांना आपल्या नेत्यांची मुले आणि जावई यांच्या व्यावसायिक देवाण-घेवाणाची माहिती असेल. त्यांच्या पक्षाने देशाला अशी सरकार दिली आहे जी आतापर्यंतची सर्वात भ्रष्ट सरकार आहे. गुंतवणूकदारांची भारतीय अर्थव्यवस्थेत रुची राहिली नाही. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महागाई आणि भ्रष्टाचाराने त्यांच्या पक्षाची सफाई झाली. पक्ष आणि सरकार दोघांच्या नेतृत्त्वात कोणताही उत्साह दिसत नाही. त्यांच्या वित्त मंत्र्यांनी काल स्वीकार केले की त्यांचा पक्ष निवडणुकीत उपेक्षित राहील. भारताच्या संसदीय निवडणुकीच्या इतिहासात होऊ शकते की, यावेळेला कॉंग्रेसला सर्वात कमी सीट मिळतील.

पक्ष आपल्या विरोधकांना सेल्समन आणि शो मॅन बोलून बदनाम करु शकतो. खेदाची बाब ही आहे की, कॉंग्रेस पक्षाकडे ना काही विकण्यासाठी आहे आणि मतदारांना ना काही दिखाव्यासाठी आहे.